**कृपया प्रसिध्दीसाठी** **2 नोव्हेंबर 2012**

## तारापूर अणुऊर्जा प्रकल्पग्रस्त मच्छिमारांना जमीन देण्याबाबत पाहाणी करण्याचे पुनर्वसन मंत्री डॉ. पतंगराव कदम यांचे आदेश

**मुंबई,शुक्रवार:** ''तारापूर अणु ऊर्जा प्रकल्पामुळे पोफरण येथील प्रकल्पग्रस्त मच्छिमारांना समुद्रालगतची जमीन देता येणे शक्य नसल्याने त्याऐवजी पालघर तालुक्यातच प्रत्येकी एक हेक्टर जमीन देता येईल का याची पाहाणी करण्याचे आदेश पुनर्वसन मंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी ठाणे जिल्हाधिका-यांना आज दिले. माजी पेट्रोलिमय मंत्री श्री. राम नाईक यांच्यासह भेटीला आलेल्या प्रकल्पग्रस्त मच्छिमारांच्या शिष्टमंडळाशी डॉ. पतंगराव कदम यांनी चर्चा केली. ज्येष्ठ मच्छिमार श्री. श्रीधर तामोरे यांच्यासह सर्वश्री विजय तामोरे, प्रमोद आरेकर, शेखर तामोरे, वासुदेव नाईक, गणपत तामोरे व शरद तामोरे हे मच्छिमार तसेच पुनर्वसन खात्याचे सचिव श्री. मिलिंद म्हसकर, ठाणे जिल्हाधिकारी श्री. पी. वेलरासु, पुनर्वसन अधिकारी श्रीमती वैदेही रानडे आदी वरिष्ठ अधिकारीही या चर्चेच्यावेळी उपस्थित होते.

तारापूर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी मुंबई उच्च न्यायालयात 2004 मध्ये दाखल केलेल्या रिट याचिकेमध्ये माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक हेही सहभागी झाले आहेत. या याचिकेच्या सुनावणीदरम्यान गेल्या वर्षी 21 नोव्हेंबर 2011 रोजी न्यायमूर्ती श्री.बी.एच. मार्लापल्ले व न्यायमूर्ती श्रीमती निशिता म्हात्रे यांच्या खंडपीठाने 438 प्रकल्पग्रस्त मच्छिमारांना किना-यालगत जमीन देणे शक्य नसल्यास पालघर तालुक्यात प्रत्येकी एक हेक्टर जमीन देता येईल का याची जिल्हाधिका-यांनी पाहाणी करुन अहवाल द्यावा, असे निर्देश दिले होते. त्यावर न्यायालयाने हा आदेश रद्द करावा असा अर्ज तारापूर अणु ऊर्जा प्रकल्पातर्फे न्युक्लीअर पॉवर कॉर्पोरेशनने केला. तसेच त्या अर्जात श्री. राम नाईक यांनी न्यायालयाला चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचा गंभीर आरोपही केला आहे. या सर्व प्रकारात जिल्हाधिका-यांनी अद्याप न्यायालयीन निर्देशांची अंमलबजावणीच केली नाही. त्यामुळे नाराज प्रकल्पग्रस्त मच्छिमारांनी आज माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक यांच्या नेतृत्वाखाली पुनर्वसन मंत्री डॉ. पतंगराव कदम यांना साकडे घातले. या संदर्भात राज्य सरकारने सकारात्मक भूमिका घ्यावी ही शिष्टमंडळाची विनंती मान्य करुन पुनर्वसन मंत्री डॉ. कदम यांनी तात्काळ पाहाणी करुन अहवाल सादर करण्याचा जिल्हाधिका-यांना आदेश दिला.

सदर चर्चेमध्ये प्रत्येक भूमीहीन कुटुंबाला रु.30,000 /- सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय होऊन आठ वर्षे झाली तरीही अद्याप ते देण्यात आलेले नाही, त्याचप्रमाणे अनेक प्रकल्पग्रस्तांना जून 2006 ते डिसेंबर 2007 या काळाचे दरमहा रु. 2,500/- घरभाडेही अद्याप मिळालेले नाही हे लक्षात आणून दिल्यानंतर या दोन्ही रकमा देण्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन करुन वाटप करण्यात यावे, असे आदेशही पुनर्वसन मंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी दिले.

प्रकल्पग्रस्तांसाठी नव्याने बांधण्यात आलेल्या निकृष्ट दर्जाच्या घरांच्या दुरुस्तीसाठी तसेच तिथे नागरी सुविधा देण्यासाठी ठाणे जिल्हाधिका-यांनी मागणी करुनही न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने अद्याप रु. 14.89 कोटी दिलेले नाहीत, ही बाबही श्री. राम नाईक यांनी पुनर्वसन मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यावर हे पैसे तातडीने मागवून घ्यावेत असे आदेशही मंत्र्यांनी उपस्थित अधिका-यांना दिले.

दीर्घकाळ उपेक्षेनंतर झालेल्या या चर्चेमुळे प्रकल्पग्रस्त मच्छिमारांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत, तथापि अधिक विलंब न लावता पुनर्वसनाची प्रक्रीया पूर्ण झाली पाहिजे, अशी प्रतिक्रिया श्री. राम नाईक यांनी व्यक्त केली.

**(कार्यालय सचिव)**